| वर्ष - 9 | अंक - 149 | UDYAM-MH-26-0158827 |




# महाईन्यूज™

पान 3 वरुन...

चिंचवडमध्ये भाजपाला 'क्रॉस व्होटिंग'चा फटका

WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार, दि. 22 जानेवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## भाजपाची ऑफर : अकोल्यात दोन्ही पक्ष एकत्र येण्याची शक्यता

# भाजपा+ ठाकरे सेना मनोमिलन?



। मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज

**राज्यातील महानगर पालिकांच्या निवडणुका पार पडल्या असून आता महापौर पदाच्या निवडीकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. अनेक अशा महापालिका आहेत तिथे कोणत्याही पक्षाला बहुमत मिळालेले नाही. त्यामुळे सत्ता स्थापन करण्यासाठी वेगवेगळी समीकरण समोर येताना दिसत आहे. अकोला महापालिकेच्या निवडणुकीत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. अशातच आता अकोल्यामध्ये भाजपने शिवसेना ठाकरे गटाला युतीची ऑफर दिली आहे. त्यामुळे राजकीय चर्चांना उधाण आहे. कारण राज्यात हे दोन्ही पक्ष एकमेकांचे विरोधक आहेत, मात्र आता अकोल्यात दोन्ही पक्ष एकत्र येण्याची शक्यता आहे.**

समोर आलेल्या माहितीनुसार अकोल्यात बहुमताच्या 41 आकड्याची जुळवणी करण्यासाठी भाजपने थेट ठाकरेंच्या शिवसेनेला ऑफर दिली आहे.

भाजपचे माजी महापौर विजय अग्रवाल आणि ठाकरेंच्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गोपाल दातकर यांची अकोल्यात बैठक झाली आहे. आज या वृत्तावर शिक्कामोर्तब झाले आहे. 80 सदस्यांच्या अकोला महापालिकेत कोणत्याही पक्षाला बहुमत मिळालेले नाही. 38 जागा जिंकत भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. तर ठाकरेंच्या शिवसेनेचे 6 नगरसेवक आहेत. त्यामुळे या दोन्ही पक्षांची युती होऊ शकते.

### अकोला महापालिकेतील पक्षीय बलाबल

| | |
|---|---|
| एकूण जागा | : 80 |
| बहुमताचा आकडा | : 41 |
| भाजप | : 38 |
| काँग्रेस | : 21 |
| उबाठा | : 06 |
| शिंदे सेना | : 01 |
| राष्ट्रवादी (अजित पवार) | : 01 |
| राष्ट्रवादी (शरद पवार) | : 03 |
| वंचित | : 05 |
| एमआयएम | : 03 |
| अपक्ष | : 02 |




## सेना कुणाची? पुन्हा 'तारीख पे तारीख'!

। मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज

**शिवसेना पक्ष आणि 'धनुष्यबाण' निवडणूक चिन्हाच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात 'तारीख पे तारीख'चे सत्र सुरुच राहिले आहे. सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठापुढे बुधवारी शिवसेनेचे प्रकरण सूचीबद्ध करण्यात आले होते. मात्र प्रकरण 37 व्या क्रमांकावर होते. त्यामुळे सुनावणी होण्याची शक्यता कमी असल्याचे गृहीत धरुन वकिलांनी न्यायालयाला पुढील तारखेबाबत विनंती केली. न्यायालयाने ती विनंती ऐकण्यास नकार देत काही आठवड्यांनंतर सुनावणी घेऊ, असे स्पष्ट केले. त्यामुळे शिवसेनेची सुनावणी पुन्हा लांबणीवर पडली आहे.**

### शिवसैनिकांचा पुन्हा अपेक्षा भंग...

शिंदे गटाने सत्तेच्या हव्यासापोटी मूळ शिवसेनेशी गद्दारी केली. त्यानंतर शिंदे गटाच्या आमदारांना अपात्र ठरवण्याऐवजी याच गटाला शिवसेना पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह देण्याचा निर्णय केंद्रीय निवडणूक आयोगाने घेतला. 2022 मध्ये आयोगाने घेतलेल्या त्या निर्णयाला शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. त्यांची याचिका मागील तीन वर्षे प्रलंबित आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे प्रकरण वेळीच निकाली निघण्याची अपेक्षा होती. मात्र बुधवारी पुन्हा अपेक्षाभंग झाला.

महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरु आहे.

याचदरम्यान शिवसेनेची सुनावणी बुधवारी सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठापुढे निश्चित करण्यात आली होती. जानेवारीत सलग दोन दिवस सुनावणी घेणार असल्याचे न्यायालयाने नोव्हेंबरमध्येच जाहीर केले होते. राज्यात पुढील महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका होणार आहे. किमान त्या निवडणुकांपूर्वी शिवसेनेच्या पक्ष आणि निवडणूक चिन्हाचा फैसला होईल, अशी अपेक्षा असंख्य शिवसैनिकांसह महाराष्ट्राच्या तळागाळातील जनतेला होती. संपूर्ण राजकीय वर्तुळाचेही सुनावणीकडे लक्ष लागले होते. मात्र बुधवारी पुन्हा अपेक्षाभंग झाला आणि शिवसेनेची सुनावणी पुढे ढकलण्यात आली.

# स्वीकृत नगरसेवक पद देण्याचा प्रश्नच नाही

## निवडणुकीपूर्वी शिंदेसेनेसोबत युती नव्हती - मुरलीधर मोहोळ

**। पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज**

**महापालिका निवडणुकीत तब्बल ११९ जागा मिळवून भाजपने एकहाती सत्ता मिळवली आहे. आता स्वीकृत नगरसेवकांबाबत ज्यांना आताच्या निवडणुकीत संधी मिळाली नाही. त्यांचा विचार होऊ शकतो. मात्र, याबाबत वरिष्ठच निर्णय घेणार असल्याचे केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक विभागाचे केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले आहे.**




### महाराष्ट्र सहकाराची पंढरी

देशात सहकाराच्या सव्वाआठ लाख संस्था आहेत. त्यातील अडीच लाख संस्था या केवळ महाराष्ट्रामध्ये आहेत. त्यामुळे महाराष्ट्र ही सहकाराची पंढरी आहे. सहकारी संस्था ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. पूर्वी सहकारी संस्था मी आणि माझे कुटुंब यापुरत्याच मर्यादित होत्या. केंद्रात सहकार मंत्रालय निर्माण करून ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्यासाठी अनेक बदल करण्यात आले आहे. मागील दीड वर्षात सहकार क्षेत्रात काम करत असताना राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना १० हजार कोटींची मदत केली आहे, अशीही माहिती मोहोळ यांनी दिली.

ते पुणे श्रमिक पत्रकार संघात आयोजित केलेल्या वार्तालाप कार्यक्रमात बोलत होते. यावेळी पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष ब्रिजमोहन पाटील, सरचिटणीस मंगेश फल्ले, खजिनदार दिलीप तायडे उपस्थित होते.

शिंदेसेनेला काही संधी देणार आहे का? या स्वीकृत नगरसेवकाच्या प्रश्नावर मोहोळ म्हणाले, महापालिका निवडणुकीपूर्वी शिंदेसेनेसोबत युती नव्हती, त्यामुळे त्यांना स्वीकृत नगरसेवक पद देण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. तसेच स्वीकृत नगरसेवक पदे देताना ज्यांना संधी मिळाली नाही, त्यांचा विचार होऊ शकतो. मात्र, याबाबत वरिष्ठच निर्णय घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### महाराष्ट्रात सर्वाधिक १४ विमानतळ

हवाई वाहतुकीत मोठे काम झाले आहे. लोहगाव विमानतळाचा विस्तार झाला. सेवा सुविधा वाढवण्यात आली. राज्यात १४ विमानतळे झाली आहेत. देशात सर्वाधिक विमानतळे महाराष्ट्रात आहेत. डोमेस्टिक वाहतुकीत आपण दुसऱ्या, तिसऱ्या क्रमांकावर आहोत, असेही त्यांनी नमूद केले.

शहर फ्लेक्समुक्त करण्याचा शब्द आम्ही महापालिका निवडणुकीत पुणेकरांना दिला. मात्र, त्यानंतरही नवनिर्वाचित नगरसेवकांचे शहरात अनधिकृत फ्लेक्स उभे राहिले आहेत. पुणेकरांना दिलेला शब्द आम्ही पाळणार आहोत. त्यामुळे शहरातील सर्व अनधिकृत फ्लेक्स तातडीने काढण्याच्या सूचना महापालिका आयुक्तांना केल्याची माहिती केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली. तसेच महापालिकेचे मोठे प्रकल्प पूर्ण करण्यास प्राधान्य दिले जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

महापालिका निवडणुकीच्या जाहीरनाम्यात भाजपने शहरातील रस्ते आणि पदपथ अतिक्रमण मुक्त करण्यासोबतच विद्रूपीकरण थांबवण्यासाठी फ्लेक्समुक्त पुण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र, भाजपच्याच नवनिर्वाचित नगरसेवकांचे अभिनंदन करणारे अनधिकृत फ्लेक्स शहरभर लागले आहेत. यावरून विरोधकांकडून आणि नागरिकांकडून भाजपच्या कथणी आणि करणी यात फरक असल्याची टीका होत आहे. या पार्श्वभूमीवर मोहोळ यांनी अनधिकृत फ्लेक्स तातडीने काढण्याच्या सूचना महापालिका आयुक्तांना केल्याचे सांगितले. शहरातील फ्लेक्स किती दिवसांत काढले जातील? या प्रश्नावर मात्र स्पष्ट उत्तर देणे मोहोळ यांनी टाळले. मोहोळ म्हणाले, आमच्याकडे पुणे महापालिकेसाठी व्हिजन आहे, ते पूर्ण करण्यासह समान पाणीपुरवठा योजना, जायका, नदीकाठ सुशोभीकरण आणि वैद्यकीय महाविद्यालय हे प्रकल्प पूर्ण करण्यास आमचे प्राधान्य राहील. महापालिकेतील महत्त्वाची पदे मुख्य शहरातील नगरसेवकांना दिल्यास समाविष्ट गावे व उपनगरातील कामांकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता आहे, या प्रश्नावर मोहोळ म्हणाले, विकास तेथील लोकप्रतिनिधींना पदे दिली तर होतो, असे काही नाही. सर्वांगीण विकासाचा अजेंडा डोळ्यासमोर ठेवून काम केले जाणार आहे, त्यामुळे समाविष्ट गावांचाही विकास होईल.

---

# बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ : सायकलपटूंकरिता ‘डोमिनार ४००’ चे अत्याधुनिक सुरक्षा कवच

**। पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज**

**‘बजाज पुणे ग्रँड टूर २०२६’ करिता बजाज कंपनीकडून पुणे, पिंपरी चिंचवड पोलीस शहर आयुक्तालयाकरिता प्रत्येकी २५ आणि पुणे जिल्हा ग्रामीण पोलीस दलाकरिता ५० अशा ‘डोमिनार ४००’या अत्याधुनिक सुविधांनीयुक्त १०० मोटार सायकलीचे देण्यात आल्या असून सायकलपटूंना सुरक्षा कवच म्हणून काम करीत आहेत.**

स्पर्धेच्या ४३७ कि.मी. अंतराच्या सायकल स्पर्धेच्या मार्गावर ही मोटरसायकल प्रथम अधिकृतपणे ताफ्याचा भाग आहे. या मोटरसायकली स्पर्धेच्या मार्गावर प्रभावीपणे गस्त घालण्यासोबतच शीघ्रगतीने आपत्कालीन प्रतिसादाचे काम आहे. विशेषत: स्पर्धेत नागरिकांचे लक्ष आकर्षित करीत आहे.

डोमिनार ४०० या आधुनिक मोटरसायकल पोलिसांना आव्हानात्मक कामे करतांना लागणाऱ्या गरजांचा विचार करून त्यांच्या मूळ आवृत्त्यांपेक्षा मोठ्या प्रमाणात सुधारित करण्यात आल्या आहेत. सुधारित दृश्यमानता आणि दळणवळण: वाहतूक व्यवस्थापित करण्यासाठी आणि घटनांना प्रभावीपणे प्रतिसाद देण्यासाठी ‘डोमिनार ४००’ मध्ये शक्तिशाली एलईडी



आपत्कालीन दिवे, सायरन आणि पुश-टू-टॉक रेडिओ ट्रान्समिशनसह सार्वजनिक घोषणा प्रणाली बसविण्यात आली आहे. यामध्ये जीपीएस ट्रॅकिंग सिस्टीम आणि मोबाईल फोन व वॉकी-टॉकीसारख्या आवश्यक उपकरणांसाठी चार्जिंग पॉइंट्स यांसारखी वैशिष्ट्ये आहेत.

प्रत्येक ‘डोमिनार ४००’ मध्ये आपत्कालीन प्रथमोपचार किट बसविण्यात आले आहे. या बाइक्समध्ये एकात्मिक आणि कुलूप लावता येण्याजोग्या साइड पॅनियर्ससह टॉप बॉक्स येतो, जो प्रथमोपचार किट, फॉरेन्सिक साधने आणि कागदपत्रे यांसारखी आवश्यक उपकरणे वाहून नेण्यासाठी तयार करण्यात आला आहे. सुधारित कार्यक्षमता, हाताळणी आणि सुरक्षा: शक्तिशाली ३७३.३ सीसी लिक्विड-कूल्ड इंजिन आणि विश्वसनीय कार्यक्षमतेसह सुसज्ज असलेल्या ‘डोमिनार ४००’ मध्ये हाय-स्पीड पाठलाग किंवा आव्हानात्मक परिस्थितीत उत्तम हाताळणी, कुशलता आणि सुरक्षिततेसाठी अँटी-लॉक ब्रेकिंग सिस्टीम , ट्रॅक्शन कंट्रोल आणि इलेक्ट्रॉनिक सस्पेंशन ॲडजस्टमेंट यासारखी प्रगत रायडर सहाय्यक वैशिष्ट्ये आहेत.

# अल्पशिक्षितांपासून उच्चशिक्षित 'कारभारी'

## चांगल्या कामाची अपेक्षा : पिंपरी-चिंचवड महापालिकेत 12 वी पसून अभियंते, तज्ज्ञ

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी । महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेमध्ये निवडून आलेल्या १२८ नवनिर्वाचित नगरसेवकांमध्ये चौथी ते सातवीपर्यंत शिकलेले नऊ, आठवी ते नववीपर्यंत शिक्षण घेतलेले २२ नगरसेवक आहेत. दहावी आणि बारावीपर्यंत शिक्षण घेतलेले सर्वाधिक ५८ नगरसेवक आहेत. काही नगरसेवक पदवीधर, डॉक्टर, वकील, अभियंते आहेत.**





महापालिकेमध्ये भाजपचे सर्वाधिक ८४, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे ३७, शिवसेना (शिंदे) पक्षाचे सहा आणि एक अपक्ष नगरसेवक निवडून आला आहे. महापालिकेच्या निवडणुकीत विजयी झालेल्या १२८ नगरसेवकांच्या शैक्षणिक पात्रतेची आकडेवारी पाहिली असता, महापालिका सभागृह हे शिक्षणाच्या विविध स्तरांचे प्रतिनिधित्व करणारे व्यासपीठ ठरले आहे.

उच्चशिक्षित नगरसेवकांचाही महापालिकेच्या सभागृहात लक्षणीय सहभाग आहे. बीए, बीकॉम, बीएस्सी अशा पदवीधर नगरसेवकांची संख्या ३३ आहे. याशिवाय एमए, एमकॉम, एमएस्सी, एमबीए सारखे पदव्युत्तर पदवी घेतलेले सहा नगरसेवक निवडून आले आहेत. महापालिकेच्या सभागृहात डॉक्टर, वकील, अभियंते आणि शिक्षकही असणार आहेत. त्यामुळे आरोग्य, कायदा, शिक्षण आणि विकासकामांबाबत महापालिका सभागृहात अभ्यासपूर्ण चर्चा होऊ शकेल.

### कोणत्या पक्षाचे किती नगरसेवक

महापालिका निवडणुकीत भाजपची दुसऱ्यांदा एकहाती सत्ता आली आहे. भाजपने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचा पराभव केला. भाजपच्या चारही आमदारांनी यशस्वी रणनिती अवलंबून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर मात केली. भाजपचे सर्वाधिक ८४ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे केवळ ३७ नगरसेवक निवडून आले. शिवसेना (शिंदे) पक्षाचे सहा आणि एक अपक्ष नगरसेवक निवडून आला आहे.

### अभियंते, वकील, डॉक्टर सभागृहात

चौथी ते सातवीपर्यंतचे शिक्षण घेतलेले नऊ, आठवी व नववीपर्यंत शिक्षण झालेले २२, दहावी उत्तीर्ण असलेले २५, अकरावी व बारावीपर्यंत शिक्षण घेतलेले ३३ नगरसेवक आहेत. ३३ पदवीधर असून सहा जणांनी पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेतले आहे. त्यामध्ये चार अभियंते, तीन शिक्षक, दोन वकील आणि एक डॉक्टरही महापालिका सभागृहात असणार आहेत.

### चार वर्षांपासून बंद असलेली पदाधिकाऱ्यांची दालने खुली!

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील प्रशासकीय राजवट संपून चार वर्षांनी नगरसेवकांच्या हाती कारभार जाणार आहे. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात महापौर निवड होण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने चार वर्षांपासून बंद असलेली पदाधिकाऱ्यांची दालने खुली केली असून सज्ज करण्याचे काम प्रशासनाने हाती घेतले आहे. दालने, महासभेचे सभागृह स्वच्छ करण्याचे काम सुरू आहे.



### अधिकाऱ्यांसाठी दालनाची शोधाशोध!

सत्तारुढ पक्षनेत्याच्या दालनात उपायुक्त अण्णा बोदडे, क्रीडा समिती सभापतीच्या दालनात उपायुक्त संदीप खोत, विरोधी पक्षनेत्याच्या दालनातून सहायक आयुक्त अतुल पाटील आणि विधी समिती सभापतीच्या दालनातून विशेष अधिकारी किरण गायकवाड कामकाज करत होते. त्यांच्यासाठी आता नवीन दालनांची व्यवस्था करावी लागणार आहे.

# चिंचवडमध्ये भाजपाला 'क्रॉस व्होटिंग'चा फटका

। पिंपरी । प्रतिनिधी । महाईन्यूज

**चिंचवड प्रभाग क्रमांक १८ च्या आखाड्यातील दोन गटात भाजप, राष्ट्रवादी अशी दुरंगी, तर उर्वरित दोन गटात तिरंगी लढत झाली. क-ड गटामध्ये काटे की टक्कर झाली. त्यात भाजपच्या माजी महापौर अपर्णा डोके, मनीषा चिंचवडे, सुरेश भोईर आणि राष्ट्रवादी (अजित पवार)चे अनंत कोऱ्हाळे विजयी झाले. या प्रभागात क्रॉस व्होटिंग, गटबाजी, मतविभागणीचा फटका भाजपला बसला.**

### क्रॉस व्होटिंगमुळे राष्ट्रवादीला फायदा

गतवेळी भाजपाला दोन, राष्ट्रवादीला एक, उद्धवसेनेला एक जागा मिळाल्या होत्या. अश्विनी चिंचवडे, राजेंद्र गावडे याचे तिकिट कापले तरीही गावडे यांनी अपक्ष लढून ताकद दाखवून दिली. भाजपने तीन जागांवर यश मिळविले असले तरी पॅनलप्रमुख शेडगे यांना पराभवाचा सामना करावा लागला. विधानसभा, शहराध्यक्ष निवडीवेळी झालेली भाजप नेत्यांतील गटबाजी आणि क्रॉस व्होटिंगचा फटका त्यांना बसला.

उमेदवारीच्या दिवशी राष्ट्रवादीच्या डोके यांनी भाजपमध्ये आणि कोऱ्हाळे राष्ट्रवादीत आले. विद्यमान नगरसेवक राजेंद्र गावडे यांना डावलल्याने अपक्ष म्हणून रिंगणात उतरले. 'अ', 'ब' गटामध्ये दुरंगी, 'क' आणि 'ड' गटात तिरंगी लढत झाली.

'अ' गटातून अपर्णा डोके यांनी १९,०३३ यांनी पूजा आगज्ञान यांचा ९,५६३ मतांनी पराभव केला. आगज्ञान यांना ९,७४० मते मिळाली. डोके चौथ्यांदा नगरसेविका झाल्या. 'ब' गटात भाजपच्या मनीषा चिंचवडे १७,०७९ यांनी राष्ट्रवादीच्या ज्योती निंबाळकर यांचा ९,८२२ मतांनी पराभव केला. निंबाळकर यांना ७,२५७ मते मिळाली. उद्धवसेनेच्या रफिया इम्रान पानसरे यांनी २२५८ तिसऱ्या क्रमांकाची मते घेतली, तर 'क' गटात भाजपचे ॲड. मोरेश्वर शेडगे, कोऱ्हाळे, राष्ट्रवादी (शप) गटाचे सागर चिंचवडे अशी तिरंगी लढत झाली. त्यात कोऱ्हाळे यांनी १४,५०४ मते घेऊन शेडगे २७०२ मतांनी पराभव केला. शेडगे यांनी ११,८०२ मते घेतली. तर 'ड' गटात भाजपचे सुरेश भोईर, अश्विनी चिंचवडे, अपक्ष राजेंद्र गावडे अशी तिरंगी लढत झाली. त्यात भोईर यांनी ११,४७२ मते घेऊन गावडे यांचा १,२४४ मतांनी पराभव केला. अपक्ष असतानाही गावडे यांनी १०,२२८ मते घेतली. राष्ट्रवादीच्या चिंचवडे यांना ७,१२९ तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली.



## भूमिका

**भारताचे वर्तमान आणि भविष्य उज्ज्वल आहे, याचे अनेक पुरावे सतत मिळतच असतात. दूरदृष्टीने केलेले नियोजन, त्यादृष्टीने घेतलेले निर्णय आणि निर्धारपूर्वक टाकलेली पावले यांचा हा परिपाक आहे. भारताने वेगवेगळ्या देशांशी उत्तम व्यापारी व औद्योगिक संबंध प्रस्थापित केले असून, सोमवारी संयुक्त अरब अमिराती (यूएई) सोबतदेखील एक करार केला.**

# भारताची अर्थगती : आशादायक वाटचाल

जीडीपी वाढीच्या दरात आगामी दोन वर्षांत थोडी घट होण्याची शक्यता व्यक्त केली जात असली, तरी यामुळे निराश होण्याचे कोणतेही कारण नाही. उलट, उपलब्ध आकडेवारी आणि आंतरराष्ट्रीय संस्थांचे अंदाज पाहता भारताची अर्थव्यवस्था अजूनही भक्कम पायावर उभी असून, योग्य आर्थिक सुधारणा वेगाने राबविल्यास प्रगतीचा वेग कायम राखणे शक्य आहे. तीन महिन्यांपूर्वी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (IMF) भारतासाठी पुढील दोन वर्षांत 6.2 टक्के आर्थिक वाढीचा अंदाज व्यक्त केला होता. मात्र आता हा अंदाज सुधारित करून 0.2 टक्क्यांनी वाढवण्यात आला असून, भारताची अपेक्षित वाढ 6.4 टक्के इतकी दर्शवली आहे. ही बाब निश्चितच दिलासादायक आहे.

आयएमएफच्या अहवालानुसार, येत्या काळात जागतिक अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेग काहीसा मंदावणार आहे. 2026 मध्ये जागतिक आर्थिक वाढ 3.3 टक्के आणि 2027 मध्ये 3.2 टक्के दरम्यान स्थिर राहील, असा अंदाज आहे. चीनची अर्थगती 2025-26 मध्ये सुमारे 5 टक्क्यांवर राहण्याची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर पाहता, भारत केवळ चीनच्याच नव्हे तर संपूर्ण जगाच्या तुलनेत अधिक वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था राहणार आहे. ही गोष्ट भारताच्या आर्थिक क्षमतेवर जागतिक स्तरावर असलेला विश्वास अधोरेखित करते.

भारतीय स्टेट बँकेच्या अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केलेल्या अंदाजानुसार, भारत 2028 मध्ये जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल. तसेच 2030 पर्यंत भारत उच्च-मध्यम उत्पन्न गटातील देश म्हणून ओळखला जाईल आणि चीन व इंडोनेशियाच्या पंक्तीत सामील होईल. जागतिक बँक विविध देशांचे वर्गीकरण दरडोई सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या आधारावर करते. त्यानुसार देश चार गटांत विभागले जातात – अल्प उत्पन्न, निम्न-मध्यम उत्पन्न, उच्च-मध्यम उत्पन्न आणि उच्च उत्पन्न. भारत सध्या निम्न-मध्यम उत्पन्न गटात असून, पुढील चार वर्षांत उच्च-मध्यम उत्पन्न गटात प्रवेश करेल, असा ठाम अंदाज वर्तवला आहे.

गेल्या काही वर्षांत भारतात दूरसंचार, रेल्वे, बंदरे, विमानतळ, रस्ते आणि इतर पायाभूत सुविधांच्या विकासावर मोठ्या प्रमाणात भर देण्यात आला आहे. सार्वजनिक तसेच खासगी गुंतवणुकीत वाढ झाली असून, त्याचे सकारात्मक परिणाम आता हळूहळू दिसू लागले आहेत. जागतिक बँकेच्या आकडेवारीनुसार, 1990 मध्ये अल्प उत्पन्न गटातील देशांची संख्या 51 होती, ती 2024 मध्ये घटून 26 वर आली आहे. त्याच काळात उच्च उत्पन्न गटातील देशांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे. वेगवान आर्थिक वाढीमुळे भारताचाही लवकरच या प्रगत गटात समावेश होण्याची शक्यता आहे.



भारताला 1 ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनण्यासाठी स्वातंत्र्यानंतर सुमारे 60 वर्षे लागली. मात्र त्यानंतर पुढील सात वर्षांत 2 ट्रिलियन डॉलर, 2021 मध्ये 3 ट्रिलियन डॉलर आणि 2025 पर्यंत 4 ट्रिलियन डॉलरचा टप्पा गाठण्यात देश यशस्वी झाला आहे. यावरून गेल्या दशकात भारताच्या अर्थगतीत झालेली लक्षणीय वाढ स्पष्ट होते. गेल्या 23 वर्षांत भारताच्या दरडोई उत्पन्नात सरासरी 8.3 टक्के चक्रवाढ दराने वाढ झाली आहे.

तथापि, विकसित भारताचे लक्ष्य गाठायचे असेल, तर ही वाढ पुरेशी नाही. सध्या उच्च उत्पन्न गटासाठी दरडोई उत्पन्नाची मर्यादा सुमारे 13,936 डॉलर आहे आणि कालांतराने ही मर्यादा वाढत जाणार आहे. 2047 पर्यंत भारताला खऱ्या अर्थाने विकसित राष्ट्र बनवायचे असेल, तर दरडोई उत्पन्नात सुमारे 8.9 टक्के चक्रवाढ दराने सातत्यपूर्ण वाढ आवश्यक आहे. त्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी आर्थिक तसेच प्रशासकीय सुधारणा अधिक वेगाने राबवणे गरजेचे आहे.

## प्रासंगिक »

### अरण्य व लाकूडतोड्या

***एकदा एक लाकूडतोड्या रानात गेला असता इकडे तिकडे पाहात रडू लागला. तेव्हा रानातल्या झाडांनी त्याला विचारले, 'तू का रडतोस ? तुला काय हवं आहे ?***

तो म्हणाला, 'माझ्या कुऱ्हाडीला दांडा नाही, त्यासाठी लाकडाचा एक लहानसा तुकडा मला द्याल तर बरं होईल.' ते ऐकून झाडांना त्याची दया आली व त्याला चिंचेच्या चिवट लाकडाचा एक तुकडा दिला. लाकूडतोड्याने तो आपल्या कुऱ्हाडीला घातला व सगळी झाडे तोडण्याचा सपाटा लावला. तेव्हा एक झाड इतर झाडांना म्हणाले, 'मित्रहो, आपण आपल्याच हाताने आपला नाश करून घेतला आहे. तेथे दुसऱ्याला नावं ठेवायला जागा नाही.'

तात्पर्य- शत्रूची कीव करून त्याला साहित्य पुरविले तर शेवटी पश्चात्ताप करण्याची वेळ येते. शत्रूवरही उपकार करण्यात, त्याच्या चुकांबद्दल क्षमा करण्यात मोठेपणा आहे हे जरी खरे असले तरी ज्यामुळे आपला शत्रू बलवान होऊन आपल्यालाच उपद्रव देऊ शकेल. अशा प्रकारचे साह्य त्याला देणे हा मूर्खपणा होय.

भारतात गेल्या शतकांपासून सहकारी संस्थांच्या चेहऱ्यात प्रचंड बदल झाले आहेत. सेवा संस्था, बहुउद्देशीय सहकारी संस्था, पतसंस्था, गैर-पतसंस्था, उत्पादन संस्था, वितरण संस्था, विपणन संस्था, प्रक्रिया संस्था यासारख्या क्रियाकलापांच्या दृष्टीने अनेक बदल नोंदवले गेलेत.

# सहकारी समूह शेतीचे क्लस्टर मॉडेल

केंद्र सरकार सध्या सहकारी क्षेत्रात क्लस्टर मॉडेलच्या माध्यमातून नव्याने संघटित आणि एकात्मिक विकास घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहे. सहकारी क्लस्टर मॉडेल हा एक संकरित दृष्टिकोन असून, त्यामध्ये सहकारी संस्थांची लोकशाही रचना आणि भौगोलिकदृष्ट्या केंद्रित उत्पादन क्लस्टरची कार्यक्षमता यांचा समन्वय साधला जातो.



विशेषतः कृषी क्षेत्रात हे मॉडेल अत्यंत प्रभावी ठरू शकते. भारतातील ८५ टक्क्यांहून अधिक शेतकरी लहान व सीमांत आहेत. कमी जमीनधारणा, वाढते उत्पादन खर्च, कमकुवत बाजारपेठ, विखंडित मूल्यसाखळी आणि हवामान बदलाचे धोके या अडचणींना ते सतत सामोरे जात आहेत. अनेक सहकारी संस्था व शेतकरी उत्पादक संघटना अस्तित्वात असल्या तरी त्यांच्याकडे पुरेसे भांडवल, व्यवस्थापन कौशल्य आणि मजबूत विपणन नेटवर्कचा अभाव आहे. यामुळे सरकारी योजना स्वतंत्रपणे राबवल्या जातात आणि अपेक्षित परिणाम साध्य होत नाहीत.

क्लस्टर-आधारित सहकारी मॉडेलमध्ये एका भौगोलिक क्षेत्रातील शेतकरी विशिष्ट पिकांवर लक्ष केंद्रित करून उत्पादन, प्रक्रिया, साठवणूक, ग्रेडिंग, पॅकिंग आणि विपणन या सर्व क्रियाकलापांसाठी सामूहिक कृती करतात. यामुळे इनपुट खरेदीत सौदेबाजीची ताकद वाढते, मध्यस्थांवरील अवलंबित्व कमी होते आणि शेतकऱ्यांना चांगल्या किमती मिळण्याची संधी निर्माण होते. सामूहिक प्रक्रिया, ब्रँडिंग आणि थेट बाजारपेठेशी जोड यामुळे स्थानिक मूल्यवर्धन व रोजगारनिर्मितीला चालना मिळते. हे मॉडेल पशुपालन, दुग्धव्यवसाय तसेच फलोत्पादन, भाजीपाला, फुलशेती, मसाले व औषधी पिकांसाठीही उपयुक्त ठरू शकते.

मात्र, अपुरी पायाभूत सुविधा, शीतगृहांचा अभाव आणि जागतिक बाजारपेठेतील मर्यादित प्रवेश ही आव्हाने दूर करण्यासाठी सरकारने आर्थिक सहाय्य, प्रशिक्षण, तंत्रज्ञान आणि निर्यातविषयक पाठबळ देणे आवश्यक आहे. क्लस्टर-आधारित सहकारी संस्था ग्रामीण अर्थव्यवस्थेला अधिक स्पर्धात्मक, लवचिक आणि समावेशक बनवू शकतात. २०४७ पर्यंत विकसित भारताच्या दिशेने वाटचाल करताना, खऱ्या अर्थाने आर्थिक परिवर्तन हे सहकारी संस्थांच्या सामूहिक शक्तीतूनच घडू शकते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.


# पाच दिवसांचा आठवडा लागू करा!

## सरकारच्या चालढकली विरोधात आझाद मैदानावर बँक कर्मचाऱ्यांचे आंदोलन

**। मुंबई । महाईन्यूज**

**देशभरातील बँक कर्मचाऱ्यांचा 5 दिवसाचा आठवडा करावा या मागणीसाठी देशव्यापी संप मंगळवारी (दि.27) होणार आहे. या संपादिवशी मुंबई शहरातील बँक कर्मचारी आझाद मैदानात सकाळी 11 वाजता एकत्रित जमून सरकार व बँक प्रशासनाच्या विरोधात महाराष्ट्र स्टेट बँक एम्प्लॉईज फेडरेशन निदर्शने करणार आहे, अशी माहिती फेडरेशनचे जनरल सेक्रेटरी देवीदास तुळजापुरकर यांनी दिली.**



2010 ला बँकर्सनी पाच दिवसांचा आठवडा ही मागणी तत्वत: मान्य करत असताना दोन शनिवार अर्धा दिवसांची सुट्टी रद्द करून उर्वरित दोन शनिवार पूर्ण सुट्टी लागू केली. त्यानंतर 11 व्या द्विपक्ष करारात पुन्हा ही मागणी तत्वतः मान्य करत उर्वरित दोन दिवसांच्या सुट्टीचा प्रस्ताव सरकारला सादर केला जाईल असे मान्य केले. 12 व्या द्विपक्ष करारात पुन्हा ही मागणी मान्य करत शिफारशी सह अंमलबजावणीसाठी हा प्रस्ताव सरकारला सादर केला जाईल असे सांगितले. तसा तो प्रस्ताव सरकारला सादर केला. पण दोन वर्षांपासून सरकारने अंमलबजावणीत चालढकल केली. अद्यापही या संदर्भात कोणतीही ठोस भूमिका घेतलेली नाही. यामुळे बँक कर्मचाऱ्यात संतापाची भावना आहे.

सरकार एकीकडे डिजिटल इंडिया, डिजिटल बँकिंगचे मोठ मोठे दावे करते. पण दुसरीकडे बँक कर्मचाऱ्यांना 5 दिवसांचा आठवडा लागू करावयाचा म्हटले की, ग्राहकांची ढाल पुढे करून तो निर्णय घेण्याचे टाळते. सरकार एलआयसी, रिझर्व्ह बँक, नाबार्ड, सेबी यासर्वांसाठी 5 दिवसांचा आठवडा लागू करते. पण बँक कर्मचाऱ्यांना लागू करत नाही. यासाठी युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सने 27 जानेवारीला एकदिवसाच्या देशव्यापी संपाची हाक दिली आहे.

# मुंबईच्या प्रदूषित हवेत हायकोर्टाची चांगलीच 'बरसात'

**। मुंबई । महाईन्यूज**

**मुंबईतील 1 हजार 954 बांधकाम स्थळांपैकी 662 बांधकाम ठिकाणी हवा गुणवत्ता निरीक्षण उपकरणेच अद्याप बसवण्यात आली नसल्याचे मंगळवारी महापालिका प्रशासनाने उच्च न्यायालयात सादर केलेल्या अहवालातून स्पष्ट झाले.**



### धारावी, चेंबूर, वडाळ्यामध्ये श्वास घेणेही मुश्कील

मुंबईचे हवामान सुधारलेले नाही. धारावी, चेंबूर, वडाळ्यामध्ये मंगळवारी एक्यूआय दोनशेपार गेला होता. त्यामुळे येथील नागरिकांना श्वास घेणेही मुश्किल झाले होते. 151 ते 200 दरम्यानचा एक्यूआय आरोग्यासाठी घातक हवेची कॅटेगरीमध्ये मोडतो. मुंबईत सरासरी हवा गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) मंगळवारी 182 वर पोहोचला होता. राजीव गांधी नगर, धारावी (211), स्वस्तिक पार्क चेंबूर (205), वडाळा पूर्व (203) तसेच त्याच भागातील वडाळा ट्रक टर्मिनस स्टेशन 1 आणि माउंट मेरी स्टेशन 2 मध्ये (200) सर्वाधिक प्रदूषण होते.

### बुलेट ट्रेन प्रकल्पाला बजावलेली नोटीस रद्द

वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स येथील बुलेट ट्रेन प्रकल्पाला नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी यापूर्वी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. मात्र उपाययोजना राबवल्यानंतर ती नोटीस रद्द करण्यात आली. तसेच वांद्रे (पूर्व) येथील सरकारी कॉलनीतील पाडकामाची कामे, जी प्रस्तावित नवीन उच्च न्यायालयाच्या संकुलाची जागा आहे, त्या ठिकाणी नियमांचे पालन न केल्यामुळे 19 जानेवारी रोजी काम थांबवण्यात आले होते. कुलाबा येथील मॅजेस्टिक आमदार निवासाला जारी केलेली काम थांबवण्याची नोटीस, उपाययोजनांचे पालन न केल्यामुळे अजूनही कायम ठेवल्याचे अहवालात स्पष्ट केले आहे.

विशेषतः इंडिगो एअरलाइन्ससमोरील मनुष्यबळ व वेळापत्रक व्यवस्थापनाच्या अडचणी यामागे कारणीभूत ठरू शकतात.

गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये वैमानिक आणि केबिन क्रूच्या कमतरतेमुळे इंडिगोला देशभरातील सुमारे दहा टक्के उड्डाणे रद्द करावी लागली होती. त्याचा थेट फटका नागपूरहून देशातील प्रमुख शहरांकडे जाणाऱ्या प्रवाशांना बसला. ऐन सुट्यांच्या काळात उड्डाणे रद्द झाल्याने अनेक प्रवाशांना पर्यायी व्यवस्था करावी लागली, तर काहींना प्रवासच रद्द करावा लागला. या पार्श्वभूमीवर आता पुन्हा एकदा फेब्रुवारीत उड्डाण कपातीची शक्यता व्यक्त होत असल्याने प्रवाशांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) लागू केलेल्या नवीन 'फ्लाइट ड्युटी टाइम लिमिटेशन' (एफडीटीएल) नियमांबाबत इंडिगोला देण्यात आलेली तात्पुरती सूट १० फेब्रुवारी रोजी संपणार आहे. या नियमांनुसार वैमानिक आणि केबिन क्रू यांच्या कामाच्या तासांवर अधिक कडक मर्यादा घालण्यात आल्या आहेत. त्यामुळे वेळापत्रक सुरळीत राखण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळाची गरज भासणार आहे. ही व्यवस्था तत्काळ पूर्ण न झाल्यास काही उड्डाणांमध्ये तात्पुरती कपात करावी लागू शकते, असे संकेत कंपनीकडून देण्यात आले आहेत.

सध्या इंडिगो दररोज सुमारे २,२०० देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय उड्डाणे चालवते. यामध्ये एअरबस ए३२० व ए३२१ विमानांचा मोठा वाटा आहे, तर काही मार्गांवर एटीआर टर्बोप्रॉप विमाने वापरली जातात. फेब्रुवारीनंतर मोठ्या प्रमाणावर उड्डाणे रद्द होऊ नयेत, यासाठी काही मध्यम आणि लहान अंतराच्या मार्गांवर एअरबसऐवजी एटीआर विमाने तैनात करण्याचा विचार सुरू आहे. त्यामुळे वेळापत्रक अधिक स्थिर राहील, असा कंपनीचा दावा आहे.

दरम्यान, नागरी विमान वाहतूक मंत्रालय आणि डीजीसीए या संपूर्ण घडामोडींवर लक्ष ठेवून आहेत. १० फेब्रुवारीनंतर प्रत्यक्ष अंमलबजावणी होत असलेल्या उड्डाण वेळापत्रकाचा आढावा घेतला जाणार असून, प्रवाशांच्या सोयीसाठी आवश्यक त्या सूचना दिल्या जातील, असे सांगण्यात येत आहे. नागपूरसह देशातील प्रमुख शहरांतील प्रवाशांसाठी येणारे काही आठवडे महत्त्वाचे ठरणार आहेत.

# 'महाराष्ट्र भारताच्या भविष्याचे पॉवर हाऊस'

## पहिल्याच दिवशी १४ लाख ५० हजार कोटी गुंतवणुकींचे १९ सामंजस्य करार

| नवी दिल्ली | महाईन्यूज

**भारतातील उद्योग आणि गुंतवणूक क्षेत्रासाठी महाराष्ट्रच गेटवे-ऑफ-इंडिया' असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधान खरे ठरवणारे तब्बल १४ लाख ५० हजार कोटींचे गुंतवणूक करार पहिल्याच दिवशी करण्यात आले. या गुंतवणुकीसोबतच राज्यात १५ लाख रोजगार संधी निर्माण होणार आहेत.**



महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाच्या माध्यमातून यंदा विविध विभागांनी आणि विविध क्षेत्रातील उद्योगांच्या प्रतिनिधी समवेत मुख्यमंत्री श्री. फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

हरित ऊर्जा, अन्न प्रक्रिया, पोलाद निर्मिती, आयटी-आयटीईस, डाटा सेंटर्सह ईव्ही-ऑटोमोबाईल, जहाज बांधणी, डिजिटल इन्फ्रा अशा विविध क्षेत्रातील ही गुंतवणूक मुंबईसह राज्याच्या रत्नागिरी, पालघर, गडचिरोली, अहिल्यानगर या भागात पोहोचणार असल्याने, तेथे उद्योग वाढीसह मोठ्या प्रमाणा रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्यासह महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागाचे प्रतिनिधीमंडळ दावोस येथे उपस्थित आहे. दावोस मधील पहिल्याच दिवसापासून जगभरातील विविध क्षेत्रातील उद्योगांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी स्वारस्य दर्शवणे सुरु केले. यातून गुंतवणुकीचा मोठा ओघ सुरु झाल्याने महाराष्ट्र पॅव्हेलियनमध्ये उत्साहाचे चित्र निर्माण झाले.

तत्पूर्वी, दावोस मधील महाराष्ट्र पॅव्हेलियनचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले.' भविष्याचे वेध घेण्यासाठी सज्ज, विश्वासार्ह आणि दीर्घकाळचा भागीदार म्हणून महाराष्ट्र स्वागत करीत आहे. भारताच्या भविष्याचे पॉवर हाऊस म्हणून महाराष्ट्र जगाला, उद्योग विश्वाला साद घालत आहे, अशी मनोदय भावनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केली.

सामंजस्य करारांवरील स्वाक्षरी व करारांच्या आदान-प्रदान प्रसंगी झालेल्या चर्चेत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, 'महाराष्ट्रावरील उद्योग क्षेत्राचा, गुंतवणुकदारांचा हा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी आम्ही सदैव सज्ज आहोत. येथे होणाऱ्या करारांवरील पुढील कार्यवाहीबाबत वॉर रूमच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येईल. उद्योजकांना आवश्यक सुविधा वेळेत आणि दर्जदार पद्धतीने मिळाव्यात याची काळजी घेतली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

'उद्योजक - गुंतवणूकदारांकडून मिळत असलेला प्रतिसाद पाहता, यंदा गतवर्षीहून अधिक गुंतवणूक आणि रोजगार संधीचे सामंजस्य करार होतील असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. विशेषतः मुंबईतील घन कचरा व्यवस्थापन, हवा आणि पाणी गुण संनियत्रणाच्या माध्यमातून सर्क्युलर ईकॉनॉमीची संरचना उभी केली जात आहे. तसेच महाराष्ट्र हे अमर्याद संधीचे राज्य आहे. त्याबाबत आणि एमएमआर क्षेत्राच्या विकासासह, तिसऱ्या मुंबईच्या निर्मितीसाठी महाराष्ट्र आर्थिक सल्लागार समितीने आराखडा निश्चित करून दिला आहे. या माध्यमातून व्यवसायाच्या आणि चांगल्या पगाराच्या रोजगार निर्मितीवर भर दिला जात असल्याचेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यावेळी म्हणाले.

दरम्यान, आगामी दोन दिवसात दावोसमध्ये एआय, क्वांटम कंम्प्युटींग, डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर, यांसह फिनटेक, लॉजिस्टिक्स अँण्ड इन्फ्रास्ट्रक्चर तसेच जहाज बांधणी, ईव्ही, अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातील आणखी काही उद्योग घटकांशीही गुंतवणुकीचे सामंजस्य करार होणार आहेत. त्यादृष्टीने त्यांच्या प्रतिनिधींशी, बोलणी -चर्चांच्या फेऱ्या सुरू करण्यात आल्या आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार गतवर्षी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा कक्ष (MAITRI) या गुंतवणूक आणि उद्योग सुलभतेला प्रोत्साहन देणाऱ्या समर्पित संस्थात्मक व्यवस्थेमुळे यंदा गुंतवणूकदार, उद्योग क्षेत्राचा महाराष्ट्राकडील ओघ आणखी वाढला आहे.

# अमेरिकेचं संकट ग्रीनलँडवर, परिणाम भारतात; सेन्सेक्स कोसळला, गुंतवणूकदारांचे शेकडो कोटी पाण्यात

| नवीदिल्ली | महाईन्यूज

**जागतिक बाजारातील नकारात्मक संकेतांमुळे आणि वाढत्या भू-राजकीय चिंतेमुळे, बेंचमार्क इक्विटी निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टी बुधवारीही कोसळल्याचे पाहायला मिळत आहे. मागील सत्रातील तीव्र विक्रीच्या दबावानंतर त्यात आणखी घसरण झाली आहे.**



सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास, सेन्सेक्स १,०२८.४९ अंकांनी किंवा १.२५ टक्क्यांनी घसरून ८१,१५१.९८ वर पोहोचला, तर निफ्टी ३००.५० अंकांनी किंवा १.१९ टक्क्यांनी घसरून २४,९३२ वर आला आहे.

मंगळवारी निफ्टी आणि सेन्सेक्समध्ये अनुक्रमे सुमारे १.४ टक्के आणि १.३ टक्क्यांची घसरण झाली होती. जी आठ महिन्यांपेक्षा अधिक काळातील त्यांची एका दिवसातील सर्वात मोठी घसरण होती.

भूराजकीय तणावाचा देखील शेअर बाजारांवर परिणाम होत आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ग्रीनलँड ताब्यात घेण्याबाबत आणि युरोपियन युनियनविरुद्ध टॅरिफ कारवाई पुन्हा सुरू करण्याबाबत केलेल्या विधानांमुळे जागतिक व्यापारातील व्यत्ययांबाबत चिंता व्यक्त होत आहे.

डॉलरच्या सततच्या मागणीमुळे आणि जागतिक पातळीवरील सावध भूमिकेमुळे, रुपया ३१ पैशांनी घसरून अमेरिकन डॉलरच्या तुलनेत ९१.२८ च्या सर्वकालीन नीचांकी पातळीवर पोहोचला आहे. फॉरेक्स (परकीय चलन) ट्रेडर्सनी सांगितले की, वाढती भू-राजकीय अनिश्चितता आणि देशांतर्गत इक्विटीमधून विदेशी भांडवलाचा सतत कमी असल्यामुळे उदयोन्मुख बाजारपेठेतील चलनांवर दबाव कायम आहे. आंतरबँक परकीय चलन बाजारात, रुपया ९१.०५ वर उघडला आणि आणखी कमकुवत होऊन ९१.२८ वर पोहोचला.

विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी (FIIS) मंगळवारी २,९३८.३३ कोटी रुपयांचे शेअर विकले. जानेवारी महिन्यात एफआयआयच्या विक्रीचे हे सलग ११ वे सत्र होते. आशियाई बाजारात, दक्षिण कोरियाचा कोस्पी, जपानचा निक्केई २२५ आणि हाँगकाँगचा हँग सेंग निर्देशांक घसरणीसह व्यवहार करत होते. रात्रभरात, अमेरिकन बाजार मोठ्या प्रमाणात घसरणीसह बंद झाले. नॅसडॅक कंपोझिट २.३९ टक्क्यांनी, एस अँड पी ५०० २.०६ टक्क्यांनी आणि डाऊ जोन्स इंडस्ट्रियल ॲव्हरेज १.७६ टक्क्यांनी घसरला.

# 'धुरंधर'ने ४७ व्या दिवशी केली फक्त 'इतकी' कमाई

'धुरंधर' या सिनेमाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला आहे. या चित्रपटाला प्रदर्शित होऊन जवळजवळ दीड महिना झाला आहे. दीड महिन्यानंतरही या चित्रपटाचे मोठ्या प्रमाणात कौतुक होत आहे. बॉलीवूडचे लोकप्रिय पटकथा लेखक व गीतकार जावेद अख्तर यांनी नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत चित्रपटाचे कौतुक केले. तसेच रणवीर सिंहच्या अभिनयाचेदेखील कौतुक केले. बॉलीवूडचा लोकप्रिय दिग्दर्शक व निर्माता करण जोहरनेदेखील चित्रपटावर कौतुकाचा वर्षाव केला आहे. लोकप्रिय दिग्दर्शक एस. एस. राजामौली यांनीदेखील 'धुरंधर'चे कौतुक केले होते. चित्रपटसृष्टीतील फक्त याच व्यक्तींनी नाही, तर अनेक लोकप्रिय कलाकारांनीदेखील चित्रपटाचे कौतुक केले आहे. रणवीर सिंह, अक्षय खन्नापासून चित्रपटातील प्रत्येक कलाकाराच्या अभिनयाचे कौतुक होताना दिसत आहे. प्रेक्षकांनीही 'धुरंधर'ला भरभरून प्रतिसाद दिला आहे. त्यामुळेच हा चित्रपट बॉलीवूडमधील सर्वांत जास्त कमाई करणारा चित्रपट ठरला आहे; तर भारतीय चित्रपटांमध्ये तो चौथ्या क्रमांकावर आहे. बॉलीवूडमधील शाहरुख खानच्या 'जवान', 'पठाण', तसेच श्रद्धा कपूरच्या 'स्त्री २' याबरोबरच विकी कौशलचा गाजलेला 'छावा' अशा अनेक चित्रपटांना मागे टाकत हा चित्रपट बॉलीवूडमधील सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला आहे. मंगळवारी म्हणजेच ४७ व्या दिवशी या चित्रपटाने १.५० कोटींची कमाई केली. सोमवारीदेखील 'धुरंधर'ने इतकीच कमाई केली होती. मंगळवारी कमाईत थोडी वाढ अपेक्षित होती. कारण- जिओ स्टुडिओने फक्त एका दिवसासाठी खास ऑफर जाहीर केली होती. चित्रपटाचे तिकीट १४९ रुपये इतके होते. मात्र, या ऑफरनंतरही कमाईत फार वाढ झालेली दिसली नाही. जिओ स्टुडिओनुसार या चित्रपटाने भारतात आतापर्यंत ८८२.५० कोटींची एकूण कमाई केली आहे. तर जगभरात या चित्रपटाने १३३८.५० कोटींची कमाई केली आहे. दरम्यान, २३ जानेवारी 'बॉर्डर २' हा बहुचर्चित चित्रपट प्रदर्शित होणार आहे. 'बॉर्डर २' प्रदर्शित झाल्यानंतर 'धुरंधर'च्या कमाईवर आणखी परिणाम होऊ शकतो. आता आगामी काळात 'धुरंधर' ९०० कोटींचा टप्पा गाठू शकणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.




# राणी मुखर्जींचं मराठी चित्रपटांबद्दल वक्तव्य

राणी मुखर्जी बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. सध्या ती तिच्या 'मर्दानी ३' चित्रपटामुळे चर्चेत आहे. अशातच राणीने मराठी सिनेसृष्टीबद्दल प्रतिक्रिया दिली आहे. यावेळी तिने लोकप्रिय मराठी अभिनेत्यांचं कौतुकही केलं आहे.

राणी मुखर्जीने आतापर्यंत विविध कथानक असलेल्या चित्रपटांत काम केलं आहे. राणीच्या मते भाषा कोणती आहे किंवा त्यातील प्रमुख कलाकार पुरुष आहे की स्त्री, या सगळ्यांपेक्षा कथानक कसं आहे, चित्रपटाचं काय वेगळेपण आहे हे अधिक महत्त्वाचं असतं; असं तिने 'महाराष्ट्र टाईम्स'शी संवाद साधताना म्हटलं आहे.

राणीला यादरम्यान 'तुला मराठी चित्रपटांत काम करायला आवडेल का?' असं विचारल्यानंतर ती म्हणाली, "मराठी सिनेमा करणं माझ्यासाठी केवळ काम नसेल, तर ते घरात परतण्यासारखं असेल. सचिन कुंडलकर यांचा 'अय्या' हा सिनेमा माझ्यासाठी स्मरणीय आहे.



# राखी सावंत 'बिग बॉस मराठी'च्या सहाव्या पर्वात येणार?



राखी सावंत ही विविध कारणांमुळे सातत्याने चर्चेत येते. तिची वक्तव्ये लक्ष वेधून घेतात. तिचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होतात. ती तिच्या बिनधास्त वागण्यासाठी ओळखली जाते. राखी सावंत बिग बॉस या रिॲलिटी शोमध्ये विविध सीझनमध्ये सहभागी झाली. २००६ साली बिग बॉसचा पहिला सीझन आला होता. त्यामध्ये राखी सावंत स्पर्धक म्हणून सहभागी झाली होती. त्यानंतर बिग बॉसच्या १४ व्या व १५ व्या सीझनमध्ये राखी सावंत वाइल्ड कार्ड म्हणून सहभागी झाली होती. तसेच, ती बिग बॉस मराठीच्या चौथ्या पर्वातदेखील सहभागी झाली होती.

आता राखी बिग बॉसच्या सहाव्या पर्वातदेखील सामील होणार असल्याचे म्हटले जात आहे.

बिग बॉसच्या घरात जाण्याआधी सोनाली राऊतने दिलेल्या एका मुलाखतीत याबद्दल वक्तव्य केले होते.

सोनाली राऊतने नवशक्तिला मुलाखत दिली होती. त्या मुलाखतीत ती म्हणाली होती, "ती खूप चांगली आहे. कारण- जेव्हा मी बिग बॉसच्या आठव्या पर्वात गेली होते, त्या वेळी तिनं मला खूप पाठिंबा दिला होता. आम्ही खूप कार्यक्रम, शोज यामध्ये एकत्र असतो. ती मला भेटत राहते."

पुढे राखीबद्दल सोनाली राऊत म्हणाली, "ती खूप एंटरटेनिंग आहे. ती खूप मजेशीर आहे", असे म्हणत राखीचे कौतुक केले.

दरम्यान, सध्या बिग बॉस मराठीच्या सहाव्या पर्वाची विविध कारणांमुळे चर्चा सुरू आहे. अनुश्री, रुचिता व राकेश यांच्यामध्ये झालेल्या वादाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. सोशल मीडियावर विविध प्रतिक्रिया उमटताना दिसत आहेत.

आता रितेश देशमुख या प्रकरणावर नेमके काय बोलणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



# विराटची बादशाहत संपली!

## किंग कोहलीला मागे टाकत मिचेल अव्वल



**। दिल्ली । प्रतिनिधी ।**
**महाईन्यूज**

**भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमध्ये ३ वनडे सामन्यांची मालिका पार पडली. मालिकेत भारतीय संघाला २-१ ने पराभवाचा सामना करावा लागला आहे. ही मालिका झाल्यानंतर आयसीसीकडून वनडे रँकिंगची घोषणा करण्यात आली आहे. या रँकिंगमध्ये न्यूझीलंडचा स्टार फलंदाज डॅरिल मिचेलने मोठी झेप घेतली आहे.**

या रँकिंगमध्ये न्यूझीलंडचा स्टार फलंदाज डॅरिल मिचेलने मोठी झेप घेतली आहे. मालिकेतील ३ पैकी २ सामन्यांमध्ये शतक झळकावून मिचेलने ३५२ धावा कुटल्या. या दमदार कामगिरीचं फळ म्हणून तो ८४५ रेटिंगसह वनडे फलंदाजांच्या यादीत अव्वल स्थानी पोहोचला आहे. तर भारताचा स्टार फलंदाज विराट कोहली या यादीत दुसऱ्या स्थानी घसरला आहे.

ही वनडे रँकिंग जाहीर होण्यापूर्वी विराट कोहली या यादीत अव्वल स्थानी होता. पण डॅरिल मिचेलने विराटला मागे टाकलं आहे. अफगाणिस्तानचा स्टार फलंदाज इब्राहिम जादरान या यादीत तिसऱ्या स्थानी पोहोचला आहे. तर रोहित शर्मा या यादीत चौथ्या स्थानी आहे. रोहित शर्माची रेटिंग ७५७ इतकी असून तो यादीत तिसऱ्या स्थानी होता. तर भारतीय वनडे संघाचा कर्णधार शुबमन गिल या यादीत पाचव्या स्थानी आहे. भारतीय संघातील टॉप ३ फलंदाज हे आयसीसी वनडे रँकिंगमध्ये टॉप ५ फलंदाजांमध्ये आहेत.

पाकिस्तानचा माजी कर्णधार बाबर आझम या यादीत सहाव्या स्थानी आहे. तर आयर्लंडचा स्टार फलंदाज हॅरी टेक्टर या यादीत सातव्या स्थानी आहे. वेस्ट इंडीजचा स्फोटक फलंदाज शे होप या यादीत आठव्या स्थानी आहे. तर चरिथ असलंका नवव्या स्थानी आणि केएल राहुल दहाव्या स्थानी आहे. वनडे क्रमवारीतील टॉप १० फलंदाजांमध्ये ४ भारतीय फलंदाजांचा समावेश आहे. विराट कोहली अवघ्या ५० पॉइंट्सने मागे आहे. तो लवकरच पुन्हा एकदा नंबर १ स्थानी कब्जा करू शकतो.



भारत आणि न्यूझीलंड यांच्यात झालेल्या वनडे मालिकेदरम्यान डॅरिल मिचेलची बॅट चांगलीच तळपली. मालिकेतील तिन्ही सामन्यांमध्ये त्याने धावांचा पाऊस पाडला. पहिल्या सामन्यात अर्धशतकी खेळी केल्यानंतर पुढील दोन्ही सामन्यांमध्ये त्याने अर्धशतक झळकावलं. याच कामगिरीच्या बळावर त्याने वनडे क्रिकेटमध्ये ८४५ रेटिंगसह अव्वल स्थान मिळवलं आहे. भारत आणि न्यूझीलंड यांच्यात झालेल्या वनडे मालिकेत त्याची मालिकावीर म्हणून निवड करण्यात आली. वनडे कारकिर्दीत त्याने ५९ सामन्यांमध्ये २६९० धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने ५८.४७ च्या सरासरीने धावा केल्या आहेत.

# ICCने बांगलादेशला दिला २४ तासांचा अल्टीमेटम!

**। दिल्ली । प्रतिनिधी ।**
**महाईन्यूज**

**टी-२० विश्वचषक २०२६ साठी बांगलादेश क्रिकेट बोर्डाने भारतात सामने खेळण्यासाठी नकार दिला होता. भारत आणि बांगलादेश यांच्यातील तणावाच्या परिस्थितीमुळे हा बीसीबीने घेतला होता आणि आयसीसीशी पत्रव्यवहारदेखील केला होता.**

पण आता आयसीसीने यावर बांगलादेश बोर्डाला खडसावून सांगत २४ तास दिले आहेत. बांगलादेशने योग्य तो निर्णय न घेतल्यास संघाला टी-२० वर्ल्डकपमधून बाहेर जावे लागणार आहे.

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने बांगलादेश क्रिकेट बोर्डाच्या (BCB) भाराताबाहेर सामने खेळवण्याच्या विनंतीला नकार दिला आहे. सर्व सदस्यांच्या उपस्थितीत झालेल्या बोर्ड बैठकीत बांगलादेशची मागणी मान्य करता येणार नाही असा निर्णय घेण्यात आला. बांगलादेश क्रिकेट बोर्डाने स्पर्धेत सहभागी होणार की नाही हे २४ तासांच्या आत जाहीर करावे, असंही सांगितलं आहे.

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (ICC) बांगलादेश क्रिकेट बोर्डाला (BCB) स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे की, जर बांगलादेशने टी-२० विश्वचषकासाठी भारतात संघ पाठवण्यास नकार दिला, तर स्पर्धेत त्यांच्या जागी स्कॉटलंडला संधी दिली जाईल. मिळालेल्या माहितीनुसार, ICC अध्यक्ष जय शाह यांच्या नेतृत्वाखालील आंतरराष्ट्रीय क्रिकेट संस्थेने या मुद्द्यावर बोर्डाच्या सदस्यांचे मत जाणून घेतले. या मतदानात बांगलादेश आणि पाकिस्तान वगळता इतर सर्व सदस्यांनी, BCBने मूळ वेळापत्रक मान्य न केल्यास, स्कॉटलंडला पर्यायी संघ म्हणून सहभागी करण्याच्या बाजूने मत दिले.






भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (BCCI) अलीकडेच आयपीएल फ्रँचायझी कोलकाता नाइट रायडर्सला बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्ताफिझूर रहमानला रिलीज निर्देश दिले होते. 'अलीकडील घडामोडी' हे कारण देत हा निर्णय घेण्यात आला आणि त्यानंतरच BCB आपल्या भूमिकेवर ठाम राहिले आहे. दरम्यान, BCBकडून असा दावा केला जात आहे की सध्याची परिस्थिती त्यांचे खेळाडू, अधिकारी आणि चाहत्यांसाठी भारतात प्रवास करण्यास अनुकूल नाही. त्यामुळे त्यांनी भारतात वर्ल्डकप सामने खेळण्याबाबत आक्षेप कायम ठेवला आहे.

मूळ वेळापत्रकानुसार बांगलादेशचे सामने कोलकाता आणि मुंबईत होणार आहेत. BCBने आपल्या सामन्यांचे ठिकाण श्रीलंकेत खेळवले जाण्याच्या भूमिकेवर ठाम राहिल्यानंतर, पुढील मार्गाबाबत चर्चा करण्यासाठी ICCच्या बोर्डाची (व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे) बैठक घेण्यात आली. त्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.

ICCच्या प्रसिद्धीपत्रकात सांगण्यात आलं आहे की, "सर्व सुरक्षा मूल्यांकनांचा सखोल विचार केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. यामध्ये स्वतंत्र सुरक्षा तपासण्यांचाही समावेश होता. या सर्व अहवालांनुसार भारतातील कोणत्याही स्पर्धेच्या ठिकाणी बांगलादेशचे खेळाडू, माध्यम प्रतिनिधी, अधिकारी किंवा चाहत्यांना कोणताही धोका नसल्याचे स्पष्ट झाले आहे."

"गेल्या काही आठवड्यांपासून आयसीसीने बांगलादेश क्रिकेट बोर्डाशी (BCB) सातत्यपूर्ण आणि सकारात्मक संवाद साधला आहे, ज्यामागचा स्पष्ट उद्देश बांगलादेशचा या स्पर्धेतील सहभाग सुनिश्चित करणं हाच होता, असे आयसीसीच्या प्रवक्त्याने निवेदनात सांगितले. यादरम्याव आयसीसीने BCBसोबत स्वतंत्र सुरक्षा मूल्यांकन अहवाल, प्रत्येक मैदानासाठी सविस्तर सुरक्षा आराखडे तसेच यजमान देशाच्या अधिकृत हमीपत्रांची माहिती शेअर केली. या सर्व बाबींमधून एकच निष्कर्ष समोर आला असून, भारतामध्ये बांगलादेश संघाच्या सुरक्षिततेला कोणताही धोका नाही, असे सातत्याने स्पष्ट झाले आहे, असेही आयसीसीने नमूद केले."

स्मार्ट PCMC SMART CITY
epaper.mahaenews.com
महाईन्यूज™
ePaper
। गुरुवार ।
। दि. 22 जानेवारी 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# ‘PCMC’ जिंकण्यासाठी तब्बल 250 कोटींचा खुर्दा?




## राष्ट्रवादीकडून प्रतिप्रभाग 2 कोटींचा पार्टी फंड?



## भाजपाची ‘मॅन–मनी–मसल पॉवर’ फुल ऑन!

**। पिंपरी-चिंचवड ।**
**अधिकराव दिवे-पाटील । महाईन्यूज**

**पिंपरी-चिंचवड महापालिका (PCMC) निवडणूक झाली. सुमारे 9 हजार कोटी रुपयांचे बजेट असलेली ही महापालिका ताब्यात घेण्यासाठी भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी या दोन्ही पक्षांनी तब्बल 250 कोटी रुपयांचा खुर्दा केल्याचे सांगितले जात आहे. सत्तेसाठीचा हा सामना केवळ विकासाच्या मुद्द्यांवर न राहता पैसा, माणसं आणि मसल पॉवरच्या जोरावर लढवला गेला. यामध्ये भाजपा यशस्वी झाली, तर राष्ट्रवादी “घायाळ” झाली.**



विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार, राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीकडून प्रत्येक प्रभागासाठी तब्बल 2 कोटी रुपयांचा खर्च पक्षाकडून देण्यात आला. भाजपाकडून पक्षाचा निधी आणि उमेदवारांचा स्वखर्च पिंपरी-चिंचवडमध्ये एकूण प्रभागांची संख्या लक्षात घेता हा आकडा थेट 250 कोटींच्या पुढे जातो, हे विशेष.



दुसरीकडे, 2017 पासून PCMC वर सत्ता राखून असलेल्या भाजपानेही ‘मॅन–मनी–मसल पॉवर’चा पुरेपूर वापर केला. इच्छुक उमेदवारांची गर्दी, अचानक सक्रिय झालेले कार्यकर्ते, महागडे प्रचार साहित्य, वाहनांचे ताफे आणि कार्यक्रमांची रेलचेल — हे सगळं नेमकं कुठून आले, त्यासाठी अमाप खर्च झाला, ही वस्तुस्थिती आहे.

## विकास नव्हे, पैसा ठरवतो निकाल?

रस्ते, पाणी, आरोग्य, कचरा व्यवस्थापन यांसारखे ज्वलंत प्रश्न बाजूला पडत असून ‘ज्याच्याकडे जास्त पैसा, त्याच्याकडे सत्ता’ हे समीकरण PCMC मध्ये रुजले आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका (PCMC) निवडणुकीत लोकशाहीचे अक्षरश: बाजारीकरण उघडपणे झाले. काही प्रभागांमध्ये तर एका मतासाठी तब्बल 18 हजार रुपये मोजले आहेत. एक-दोन अपवाद वगळता पैसे वाटपाचे प्रकारसुद्धा पुढे आले नाही. सोसायटीधारक मतदारांनाही आमिष दाखवण्यात आले. काही सोसायटींनी अक्षरश: 1 ते दीड लाख रुपयांचा आकडा फोडला. एवढा अमाप पैसा खर्च करुनसुद्धा काही उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला, ही वस्तुस्थिती आहे.

## आता महापौर, स्थायी समितीसाठी घोडेबाजार!

महापालिका निवडणूक झाली. 128 नगरसेवक निवडून आले. आता महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत आज (दि.22) होणार आहे. त्यामुळे महापौर पदासाठी आणि स्थायी समिती सभापती पदासाठीसुद्धा घोडेबाजार होणार, हे निश्चित आहे. विशेष म्हणजे, आता ज्या उमेदवारांना अनपेक्षीत पराभवाचा सामना करावा लागला आहे. त्यांनी स्वीकृत नगरसेवकपदासाठी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. संख्याबळानुसार, भाजपाला 7 आणि राष्ट्रवादीला 3 स्वीकृत नगरसेवक नियुक्त करता येणार आहेत. त्यासाठी 5 कोटी रुपयांचा पार्टी फंड देण्याची तयारी काही इच्छुकांनी केली आहे, असे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले.

## महापौर नको, ताटाखालील मांजर हवा?

तब्बल 30 लाख पिंपरी-चिंचवडकर नागरिकांचे प्रतिनिधीत्व करणारा “प्रथम नागरिक” हा स्वत: निर्णय घेणारा असावा. केवळ बहुमत भाजपाकडे आहे, म्हणून भाजपाचा महापौर होईल. पण, सत्ताधीशांच्या ताटाखालचे मांजर होण्यात धन्यता मानणारा महापौर नको, अशी शहरवासीयांची भूमिका आहे. त्या अनुशंगाने भाजपाचे स्थानिक शीर्षस्थ नेते निर्णय घेतील, अशी अपेक्षा नाही. कारण, सत्ता असली की “पैसा आणि पैसा असला की सत्ता” हे समीकरण दोन्ही पक्षांना लागू होते. कारण, भाजपा असो किंवा राष्ट्रवादी असो दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी किंवा स्थानिक पदाधिकाऱ्यांनी दयावान नव्हे, तर धनवान होण्यात धन्यता मानली आहे, ही वस्तुस्थिती आहे.



# पिंपरी-चिंचवड शहरात व्यापक मोहीम राबवणार

## थकबाकीदारांनो सावधान!: महापालिकेने सुरू केली जप्ती कारवाई!

**। पिंपरी-चिंचवड ।**
**महाईन्यूज**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत मालमत्ता कर वसुलीसाठी जप्ती मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात थकबाकीदारांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून २१ जानेवारी २०२६ पासून ही मोहिम शहरभर व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे.**




या संदर्भात झालेल्या आढावा बैठकीत महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर व कर आकारणी व कर संकलन विभागाचे उपायुक्त पंकज पाटील यांनी विभागातील सर्व सहाय्यक मंडल अधिकाऱ्यांना थकबाकीदारांवर कोणतीही सूट न देता कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. या बैठकीस शहरातील १८ विभागीय कार्यालयांतील सहाय्यक मंडल अधिकारी उपस्थित होते.

मालमत्ता कर थकबाकी वसुलीसाठी विभागनिहाय स्वतंत्र पथके तयार करण्यात आली असून, येत्या काही दिवसांत थकबाकीदारांना जप्ती अधिपत्रे बजावण्यात येणार आहेत. अधिपत्र बजावल्यानंतरही जर संबंधित मालमत्ताधारकांनी मालमत्ता कराचा भरणा केला नाही, तर त्यांच्या मालमत्तांवर प्रत्यक्ष जप्तीची कारवाई करण्यात येणार आहे. तसेच या मोहिमेंतर्गत निवासी थकबाकीदारांची नळ कनेक्शन खंडित करणे तसेच बिगरनिवासी थकबाकीदारांच्या मालमत्तांवर थेट जप्ती अशी कारवाई केली जाणार आहे.

### ३५ मालमत्ता जप्त तर १३३ नळ कनेक्शन खंडित....

पिंपरी चिंचवड महापालिकेने कर संकलन मोहिमेला गती दिली असून, या कारवाईसाठी १८ विभागीय कार्यालयांतील सर्व गटप्रमुखांना जबाबदारी देण्यात आली आहे. त्यानुसार शहरातील निवासी व बिगरनिवासी थकबाकीदारांवर कठोर कारवाई सुरू आहे. आतापर्यंत शहरातील ३५ मालमत्तांची जप्ती करण्यात आली असून, १३३ थकबाकी मालमत्ताधारकांचे नळ कनेक्शन खंडित करण्यात आले आहे.

त्यामुळे नागरिकांनी चालू आर्थिक वर्षातील तसेच थकीत मालमत्ता कर तात्काळ भरून जप्तीची कटू कारवाई टाळावी, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

“ पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विकासासाठी मालमत्ता कर हा अत्यंत महत्त्वाचा महसूल स्रोत आहे. या कराच्या माध्यमातून शहरातील पायाभूत सुविधा, नागरी सेवा, स्वच्छता व्यवस्था, पाणीपुरवठा व शिक्षण व्यवस्था सक्षमपणे राबवली जाते. वारंवार सूचना व नोटिसा देऊनही मालमत्ता कर भरण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर नियमान्वये कारवाई करण्यात येईल.
**- तृप्ती सांडभोर, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी–चिंचवड महापालिका.**

“ मालमत्ता कर थकबाकीदारांची अचूक माहिती, क्षेत्रनिहाय नियोजन आणि वेळापत्रकबद्ध कारवाई या तीन बाबींवर भर देऊन ही मोहीम राबविण्यात येत आहे. प्रत्येक विभागीय कार्यालयामार्फत रोजच्या आढाव्यानुसार प्रगती तपासली जात असून, थकबाकीदारांनी तातडीने कर भरणा केल्यास जप्ती व नळ कनेक्शन खंडित करण्यासारखी कारवाई टाळता येऊ शकेल. त्यामुळे नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने कर भरून महापालिकेला सहकार्य करावे.
**- पंकज पाटील, उपायुक्त, पिंपरी–चिंचवड महापालिका.**

### थकबाकीदारांची यादी केली जाणार प्रसिद्ध

ज्या थकबाकीदारांनी अद्यापही मालमत्ता कराचा भरणा केलेला नाही, अशा सर्व थकबाकीदारांची यादी महापालिकेमार्फत प्रसिद्ध केली जाणार आहे. ही यादी प्रसिद्ध केल्यानंतर संबंधित थकबाकीदारांकडून याबाबत करण्यात येणारी कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नसल्याचे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे संबंधित थकबाकीदारांनी जप्तीची कारवाई टाळण्यासाठी तात्काळ थकीत मालमत्ता कराचा भरणा करावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.



## ड्रेनेजचे काम बंद पाडत कंत्राटदारावर चाकूने वार

**पिंपरी :** चिंबळी येथे सुरू असलेले ग्रामपंचायतीच्या ड्रेनेजचे काम दोन जणांनी चाकूचा धाक दाखवून बंद पाडले. त्याबाबत विचारणा करण्यासाठी गेलेल्या कंत्राटदारावर चाकूने वार केल्याची घटना सोमवार (१९ जानेवारी) सायंकाळी चिंबळी येथील बर्गे वस्ती भागात घडली. याबाबत ३२ वर्षीय तरुणाने आळंदी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांनी जेसीबी चालवण्यासाठी घेतला आहे. जेसीबीचा चालक जेसीबीच्या साहाय्याने ग्रामपंचायतचे ड्रेनेजचे काम करत होता. त्यावेळी आरोपी तिथे आले. त्यांनी काम बंद पाडले. जेसीबी चालकाला चाकूचा धाक दाखवला. याबाबत फिर्यादी हे आरोपींना जाब विचारण्यासाठी गेले असता आरोपींनी फिर्यादी यांना मारहाण करून त्यांच्यावर चाकूने वार करत जखमी केले. आळंदी पोलीस तपास करत आहेत.

## ज्येष्ठ नागरिकाची १ कोटींची सायबर फसवणूक

**। पिंपरी । प्रतिनिधी ।**
**महाईन्यूज**

**पिंपरी-चिंचवड उद्योगनगरी पिंपरी-चिंचवड शहरात सायबर गुन्हेगारांनी सीबीआय अधिकारी असल्याचे भासवून ७७ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाची तब्बल १ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ‘डिजिटल अटक’ची भीती दाखवून आरोपींनी ही रक्कम उकळल्याचे समोर आले आहे.**



या प्रकरणी पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

चिंचवड येथील शिवाजी पार्क परिसरात राहणारे अशोक कृष्णा सराफ (वय ७७) यांना काही अज्ञात व्यक्तींनी फोन केला. फोनवरून आरोपींनी स्वतःची ओळख प्रथम टेलिफोन विभागाचे अधिकारी, नंतर सर्व्हिलन्स अधिकारी आणि अखेरीस सीबीआय अधिकारी अशी करून दिली. त्यांनी सराफ यांना सांगितले की, त्यांच्या नावावरील कॅनरा बँकेच्या खात्याचा वापर नरेश गोयल यांच्यावरील ईडी कारवाईतील मनी लाँड्रिंग प्रकरणात झाला आहे.

या प्रकरणात तात्काळ अटक होऊ शकते, अशी भीती दाखवून आरोपींनी सराफ यांचे मानसिक खच्चीकरण केले. तसेच बँक खात्यातील आणि म्युच्युअल फंडातील रकमेची ‘लिगॅलिटी तपासणी’ करायची असल्याचे सांगत, सर्व पैसे ठराविक बँक खात्यांमध्ये ट्रान्सफर करण्यास भाग पाडले. तपासणी पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण रक्कम परत दिली जाईल, असे आश्वासनही देण्यात आले. आरोपींच्या सांगण्यानुसार सराफ यांनी टप्प्याटप्प्याने सुमारे १ कोटी रुपये विविध खात्यांमध्ये ट्रान्सफर केले. मात्र, रक्कम पाठवल्यानंतर कोणताही संपर्क न झाल्याने आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले.

# PCCOER wins first place in 'SAE India E-Baha 2026' National Competition

## PCCOER wins 11 medals and Rs 3 lakh 60 thousand prize money

**Pune : IN THE "SAE INDIA E-BAHA 2026" NATIONAL COMPETITION ORGANIZED BY THE SOCIETY OF AUTOMOTIVE ENGINEERS AT PITHAMPUR, "TEAM NASHORNS" FROM THE MECHANICAL DEPARTMENT OF PIMPRI CHINCHWAD COLLEGE OF ENGINEERING AND RESEARCH (PCCOER) IN RAVET, PIMPRI CHINCHWAD EDUCATION TRUST (PCET), PERFORMED BRILLIANTLY AND WON FIRST PLACE IN THE COUNTRY WITH A TOTAL OF 11 MEDALS AND A PRIZE MONEY OF RS 3 LAKH 60 THOUSAND. MORE THAN A HUNDRED ENGINEERING COLLEGES FROM ACROSS THE COUNTRY PARTICIPATED IN THE COMPETITION.**







PCCOER's Team Nashorns won first place in various categories like Durability, Excellence, Overall Physical Dynamics, Suspension and Traction and third place in Static, Intellectual, CAE categories as well as the Best Debut Award. PCCOER students have brought laurels to the college by winning first place at the national level in their debut in this national competition. PCET President Dnyaneshwar Landge said that this golden moment has been witnessed due to the combined efforts of all the students in this team, their mentors, principals, coordinators and the infrastructure provided by the PCET management.

Student captain Saurabh Patil, vice-captain Mahendra Kumbhar, driver Sajid Mulani, Prithviraj Patil, Akhilesh Wanjpay, Devendra Patil, Omkar Shejwal, Dheeraj Patil, Austin George, Hemant Patil, Parth Pandekar, Jay Pagare, Rashmeet Goyal, Shrikrishna Mane, Vishwajit Patil, Pranav Kamble, Vishwajit Kolhe, Dishant Pipere, Shrirang Nair, Soham Shelar, Ayush Patil, Samarjit Tanpure, Aditya Mane, and Om Bade from PCCOER participated in this.Principal Dr. Harish Tiwari, Head of Department Dr. Gulab Siraskar, Prof. Sukhdeep Chougule, Sujit Chaudhary guided the students.

Pimpri Chinchwad Education Trust President Dnyaneshwar Landge, Vice President Padmatai Bhosale, Secretary Vitthal Kalbhor, Treasurer Shantaram Garade, Trustee Harshvardhan Patil, Entrepreneur Narendra Landge, Ajinkya Kalbhor, Executive Director Dr. Girish Desai, Director Principal of PCCOER Dr. Harish Tiwari congratulated the students and wished them well.




Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
Documentary
Weddings
Drone
Motion Graphics
Testimonials
Tutorial videos
Product Videos
Animation
Social Media Content
Promotional Videos
Real Estate
Corporate
Advertising
Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046